**सुरक्षा रक्षक मंडळात सुरक्षा रक्षकांची नोंदणी (registration) करण्याबाबतची कार्यप्रणाली आणि इतर निकष निश्चित करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन निर्णय क्र.एसजीए-२०२४/प्र.क्र.९६/कामगार-५,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २७ मार्च, २०२५

**वाचा :-**

१) शासन आदेश क्र. एसजीए-१५२००९/प्र.क्र.१५८८/कामगार-५, दिनांक २ मार्च, २००९
२) शासन निर्णय क्र. एसजीए-१५१०/प्र.क्र.२३९४/कामगार-५, दिनांक २५ ऑगस्ट, २०१०
३) शासन निर्णय क्र. एसजीए-१५१०/प्र.क्र.२३९४/कामगार-५, दिनांक १७ ऑक्टोंबर, २०१३
४) शासन निर्णय क्र. एसजीए-१५०८/प्र.क्र.१४६६ (अ) /कामगार-५, दिनांक १५ जुलै, २००९
५) शासन निर्णय क्र. एसजीए-२०१८/प्र.क्र.६४४/कामगार-५, दिनांक २७ डिसेंबर, २०१८
६) सह आयुक्त (कामगार) यांचे दि.१०.०६.२०२४ चे पत्र.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ आणि त्या अंतर्गत तयार केलेल्या योजना २००२ मधील तरतुदीनूसार राज्यातील सुरक्षा रक्षकांच्या नोकरीचे नियमन व त्यांच्या कल्याणासाठी राज्यात सुरक्षा रक्षक मंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत. सुरक्षा रक्षक मंडळात नोंदीत असलेल्या मुख्य मालकाने सुरक्षा रक्षक मंडळाकडुन सुरक्षा रक्षकांची मागणी केल्यास आवश्यकतेनुसार मंडळाने नोंदीत (registered) मालकास सुरक्षा रक्षक पुरविण्याची तरतुद आहे. त्याबाबत शासनाच्या दि.०२.०३.२००९ रोजीचा शासन आदेश निर्गमित केला होता.

सुरक्षा रक्षकांच्या नोंदणीच्या अनुषंगाने यापूर्वी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील आढळुन आलेल्या त्रुटी, सुरक्षा रक्षकांच्या नोंदणी प्रक्रीयेमध्ये असलेली पारदर्शकतेची आवश्यकता, सुरक्षा रक्षकांच्या नोंदणी प्रक्रीयेत आढळुन आलेल्या अडचणी या सर्व बाबींच्या अनुषंगाने शासनामार्फ़त सुरक्षा रक्षक नोंदणी प्रक्रीया पारदर्शक व सुलभ होण्याच्या अनुषंगाने वेळोवेळी आढावा घेण्यात आलेला होता. आढाव्याअंती सुरक्षा रक्षकांच्या नोंदणीची सुधारीत कार्यप्रणाली व निकष निश्चित करणे आवश्यक असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले असून,त्यानुसार सुरक्षा रक्षकांच्या नोंदणीप्रक्रीयेसाठी सुधारीत मार्गदर्शक तत्वे आणि निकष निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सुरक्षा रक्षकांच्या नोंदणी प्रक्रीयेबाबत यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले संदर्भामध्ये नमुद क्र. १,२,३,४ व ५ शासन निर्णय, आदेश अधिक्रमित करण्यात येत असुन महाराष्ट्र राज्यातील जिल्हा

...ा रक्षक मंडळांतील सुरक्षा रक्षकांची नोंदणी करण्याची कार्यपध्दती निकष, शैक्षणिक अर्हता, ...दानी व शारीरिक चाचणी व इतर सर्व निकष खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत :-

१. **सुरक्षा रक्षक नोंदणी पध्दत:-**

१. सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यक्षेत्रामधील नोंदीत असलेल्या आस्थापनांकडून मंडळाकडे सुरक्षा रक्षकांची जेवढी मागणी प्राप्त झाली आहे तेवढ्या सुरक्षा रक्षकांची संख्या आणि त्या संख्येच्या १० टक्के एवढी येणारी संख्या अशा एकत्रित सुरक्षा रक्षकांची नोंदणी मंडळाने करावी.

२. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे सुरक्षा रक्षकांची नोंदणी प्रक्रीया राबविण्यासाठी प्रत्येक मंडळाने प्रथमत: शासनाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

३. सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यक्षेत्रामधील नोंदीत असलेल्या आस्थापनांकडून मंडळाकडे सुरक्षा रक्षक पुरविण्याबाबत लेखी मागणी असावी. अशा प्राप्त झालेल्या लेखी मागणीची खातरजमा सह-आयुक्त ,कामगार यांनी करावी.

२. **सुरक्षा रक्षकांची नोंदणी प्रक्रीया राबविण्याकरिता प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीची कार्यपध्दती:-**

१. सुरक्षा रक्षकांची नोंदणी करण्याकरिता प्रत्येक सुरक्षा रक्षक मंडळाने वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागवावेत.

२. सुरक्षा रक्षक मंडळाने उपरोक्त नमूद सुरक्षा रक्षकांची नोंदणी करण्याकरिता जाहिरात प्रक्रीया ही शक्यतो २ वर्षातून एकदा राबवावी.

३. सदर जाहिरात प्रक्रीया राबविण्यापूर्वी जाहिरातीचा मसुदा तयार करुन त्यास कामगार आयुक्तांची मान्यता घेणे आवश्यक राहील.

४. तदनंतर सुरक्षा रक्षकांची नोंदणी करण्याकरिता जाहिरात मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी. तसेच सदर जाहिरात ही माहिती व जनसंपर्क संचालनालयामार्फ़त मराठी,हिंदी,इंग्रजी व उर्दु वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात यावी.

५. सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यक्षेत्रामधील नोंदीत असलेल्या आस्थापनांकडून मंडळाकडे सुरक्षा रक्षकांची जेवढी मागणी प्राप्त झाली आहे त्या संख्येच्या १० टक्के सुरक्षा रक्षकांची नोंदणी ही मंडळाच्या प्रतिक्षायादीवर करण्यात येईल व मंडळाच्या कार्यक्षेत्रातील आस्थापनांनी केलेल्या मागणीनुसार सदर सुरक्षा रक्षक हे आस्थापनांना वितरीत करण्यात येतील.

६. सुरक्षा रक्षकांची नोंदणी प्रक्रीया राबविण्याकरिता जाहिरात प्रसिध्द करण्यात आल्याच्या दिनांकापासून एक महिन्याचा कालावधी उमेदवारांना अर्ज भरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. संबंधित सुरक्षा रक्षक मंडळाने वेळोवेळी विहित केलेले शुल्क उमेदवारांना भरणे आवश्यक राहील.

३. **सुरक्षा रक्षकांची नोंदणी करण्याकरिता आवश्यक असलेले पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे:-**

१. वयोमर्यादा:-उमेदवाराचे किमान वय १८ वर्ष व कमाल वय ३५ वर्ष असेल.

२. शैक्षणिक पात्रता:- वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकावेळी उमेदवाराने माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (१२ वी) उत्तीर्ण असणे आवश्यक राहील .

३. अधिवास :- सदर उमेदवारांकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile certificate) असणे आवश्यक आहे.

४. सुरक्षा रक्षक भरती ज्या आस्थापनांना सुरक्षा रक्षक पुरविण्यासाठी करण्याचे मंडळाने ठरविले असेल त्या आस्थापनेसाठी ज्यांची जमीन संपादीत झाली आहे अशा प्रकल्पग्रस्त कुटुंबातील घटकांच्या पात्र उमेदवारास प्राधान्य दयावे.जर प्रकल्पग्रस्त कुंटुबातील उमेदवार उपलब्ध नसल्यास मंडळाच्या प्रतिक्षा यादीवरील सामाईक अनुक्रमांकामधील क्रमाने येणाऱ्या सुरक्षा रक्षकांना सदर आस्थापनेत अथवा मंडळाच्या कार्यक्षेत्रातील इतर ठिकाणी वितरीत करावे.

५. सुरक्षा रक्षकांची मंडळाच्या कार्यक्षेत्रात ऐच्छिक बदली असेल तर अथवा पूर्णत: रिक्त पद असल्यास बदल्या करता येतील. परिणामित व मुख्य मालकांच्या शिफ़ारशीनुसार नोंदणी केलेल्या सुरक्षा रक्षकांची कोणत्याही परिस्थितीत बदली करता येणार नाही. तसेच एका सुरक्षा रक्षक मंडळातुन अन्य सुरक्षा रक्षक मंडळात बदली करण्यास कोणताही सुरक्षा रक्षक पात्र असणार नाही.

६. शारिरीक पात्रता:-

| | पुरुष उमेदवार | महिला उमेदवार |
|---|---|---|
| उंची | किमान १६५ से.मी. | किमान १५८ से.मी. |
| वजन | ५० किलो ग्रॅम | ४५ किलो ग्रॅम |
| छाती | ७९ से.मी. न फ़ुगवता, फुगवून ८४ से.मी. | -- |

७. उपरोक्त नमूद वय, शिक्षण व शारिरिक पात्रतेच्या निकषाप्रमाणे पात्रता नसल्यास उमेदवारांचा पुढील प्रक्रियेकरीता विचार केला जाणार नाही.

४. **उपरोक्तप्रमाणे निकषात बसणाऱ्या उमेदवारांची मैदानी परीक्षा खालीलप्रमाणे असेल :-**

१. मैदानी चाचणी ही एकूण १०० गुणांची असेल व मैदानी चाचणीत उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५०% गुण मिळणे आवश्यक आहे.

२. मैदानी चाचणीमध्ये अणुत्तीर्ण अर्जदारांचा अंतिम गुणवत्ता यादीकरीता विचार केला जाणार नाही.

३. मैदानी चाचणीत एकूण गुणांची बेरीज अपूर्णांकात असल्यास ती अपूर्णांकातच ठेवून, मैदानी चाचणीचा निकाल तयार करण्यात येईल.

४. मैदानी परीक्षा :- एकूण गुण १००

| अ.क्र. | पुरुष उमेदवार | महिला उमेदवार | गुण |
|---|---|---|---|
| १ | १६०० मीटर धावणे | ८०० मीटर धावणे | ४० |
| २ | १०० मीटर धावणे | १०० मीटर धावणे | ३० |
| ३ | गोळा फेक | गोळा फेक | ३० |

मैदानी परीक्षेदरम्यान काही अपघात झाल्यास अथवा अघटीत प्रसंग ओढवल्यास संबंधित मंडळ त्यास जबाबदार राहणार नाही, याची अर्जदाराने नोंद घ्यावी. तसे हमीपत्र अर्जदाराने मंडळास सादर करणे बंधनकारक राहील. हमीपत्र सादर केल्यानंतरच अर्जदारास मैदानी परीक्षेमध्ये सहभागी होता येईल.

सुरक्षा रक्षकांच्या नोंदणी प्रक्रीयेत उमेदवारांची शारीरिक चाचणी व मैदानी परीक्षा ही संबंधित मंडळाच्या कार्यक्षेत्रातील संबंधित जिल्हा पोलीस प्रशासनामार्फत व जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या सहकार्याने राबविण्यात येईल. संबंधित सुरक्षा रक्षक मंडळातील अध्यक्ष व इतर अधिकारी हे शारीरिक चाचणी व मैदानी परिक्षेकरिता आवश्यक असलेले सर्व सहकार्य संबंधीत जिल्हा पोलीस प्रशासनास करतील.

अ) **(पुरुष उमेदवारांकरिता) :**

**१) धावणे - (१६०० मी. धावणे)**

| १६०० मीटर अंतर पुर्ण करण्यास लागलेला कालावधी | द्यावयाचे गुण |
|---|---|
| ५ मि. १० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी. | ४० |
| ५ मि. १० सेकंदापेक्षा जास्त परंतु ५ मि. ३० सेकंद त्यापेक्षा कमी | ३६ |
| ५ मि. ३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ५ मि. ५० सेकंद त्यापेक्षा कमी | ३२ |
| ५ मि. ५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६ मि. १० सेकंद त्यापेक्षा कमी | २८ |
| ६ मि. १० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६ मि. ३० सेकंद त्यापेक्षा कमी | २४ |
| ६ मि. ३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ६ मि. ५० सेकंद त्यापेक्षा कमी | २० |
| ६ मि. ५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ७ मि. १० सेकंद त्यापेक्षा कमी | १६ |
| ७ मि. १० सेकंदापेक्षा जास्त परंतु ७ मि. ३० सेकंद त्यापेक्षा कमी | १० |
| ७ मि. ३० सेकंदापेक्षा जास्त | ०० |

(उमेदवार १६०० मी. अंतर धावू न शकल्यास त्यास शुन्य गुण देण्यात येतील.)

२) धावणे (१०० मिटर धावणे)

| १०० मीटर अंतर पुर्ण करण्यास लागलेला कालावधी | द्यावयाचे गुण |
|---|---|
| ११.५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी. | ३० |
| ११.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु १२.५० सेकंद त्यापेक्षा कमी | २४ |
| १२.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु १३.५० सेकंद त्यापेक्षा कमी | २० |
| १३.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु १४.५० सेकंद त्यापेक्षा कमी | १६ |
| १४.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु १५.५० सेकंद त्यापेक्षा कमी | १२ |
| १५.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु १६.५० सेकंद त्यापेक्षा कमी | ०८ |
| १६.५० सेकंदापेक्षा जास्त परंतु १७.५० सेकंद त्यापेक्षा कमी | ०२ |
| १७.५० सेकंदापेक्षा जास्त | ०० |

(उमेदवार १०० मी. अंतर धावू न शकल्यास त्यास शुन्य गुण देण्यात येतील.)

**३) गोळा फेक** - उमेदवारास ७.२६० किलोग्रॅम वजनाचा गोळा फेकावा लागेल. गोळाफेकीसाठी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील :-

| गोळाफेकीचे अंतर (मीटरमध्ये) | द्यावयाचे गुण |
|---|---|
| ८.५० मीटर किंवा त्यापेक्षा जास्त | ३० |
| ७.९० मीटर किंवा जास्त परंतू ८.५० मीटरपेक्षा कमी | २४ |
| ७.३० मीटर किंवा जास्त परंतू ७.९० मीटरपेक्षा कमी | २० |
| ६.७० मीटर किंवा जास्त परंतू ७.३० मीटरपेक्षा कमी | १६ |
| ६.१० मीटर किंवा जास्त परंतू ६.७० मीटरपेक्षा कमी | १२ |
| ५.५० मीटर किंवा जास्त परंतू ६.१० मीटरपेक्षा कमी | १० |
| ४.९० मीटर किंवा जास्त परंतू ५.५० मीटरपेक्षा कमी | ०८ |
| ४.३० मीटर किंवा जास्त परंतू ४.९० मीटरपेक्षा कमी | ०६ |
| ३.७० मीटर किंवा जास्त परंतू ४.३० मीटरपेक्षा कमी | ०४ |
| ३.१० मीटर किंवा जास्त परंतू ३.७० मीटरपेक्षा कमी | ०२ |
| ३.१० मीटर पेक्षा कमी | ०० |

गोळा फेकताना उमेदवाराच्या पायाचा स्पर्श सुरवातीच्या सीमारेषेला झाल्यास ती संधी वाद ठरवली जाईल व एक जादा संधी देण्यात येईल. गोळा फेकताना एक चूक क्षम्य असुन त्यासाठी गुण कमी करण्यात येणार नाहीत.

गोळाफेकीत फेकलेला गोळा जर सीमांकन रेषेच्या मध्यावर पडला तर उमेदवारास नजीकच्या वरच्या श्रेणीतील गुण दिले जातील.

**ब) महिला उमेदवारांकरिता :**

**(१) धावणे - (८०० मिटर धावणे)**

| ८०० मीटर अंतर पुर्ण करण्यास लागलेला कालावधी | द्यावयाचे गुण |
|---|---|
| २ मि. ५० सेकंद किंवा त्यापेक्षा कमी. | ४० |
| २ मि. ५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मि. ०० सेकंद त्यापेक्षा कमी | ३६ |
| ३ मि. ०० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मि. १० सेकंद त्यापेक्षा कमी | ३२ |
| ३ मि. १० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मि. २० सेकंद त्यापेक्षा कमी | २८ |
| ३ मि. २० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मि. ३० सेकंद त्यापेक्षा कमी | २४ |
| ३ मि. ३० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मि. ४० सेकंद त्यापेक्षा कमी | २० |
| ३ मि. ४० सेकंदापेक्षा जास्त परंतु ३ मि. ५० सेकंद त्यापेक्षा कमी | १६ |
| ३ मि. ५० सेकंदापेक्षा जास्त परंतु ४ मि. ०० सेकंद त्यापेक्षा कमी | १० |
| ४ मि. ०० सेकंदापेक्षा जास्त | ०० |

**२) धावणे (१०० मिटर धावणे)**

| १०० मीटर अंतर पुर्ण करण्यास लागलेला कालावधी | द्यावयाचे गुण |
|---|---|
| १४ सेकंद किंवा त्यापेक्षा कमी. | ३० |
| १४ सेकंदापेक्षा जास्त परंतु १५ सेकंद त्यापेक्षा कमी | २४ |
| १५ सेकंदापेक्षा जास्त परंतु १६ सेकंद त्यापेक्षा कमी | २० |
| १६ सेकंदापेक्षा जास्त परंतु १७ सेकंद त्यापेक्षा कमी | १६ |
| १७ सेकंदापेक्षा जास्त परंतु १८ सेकंद त्यापेक्षा कमी | १२ |
| १८ सेकंदापेक्षा जास्त परंतु १९ सेकंद त्यापेक्षा कमी | ०८ |
| १९ सेकंदापेक्षा जास्त परंतु २० सेकंद त्यापेक्षा कमी | ०२ |
| २० सेकंदापेक्षा जास्त | ०० |

**३) गोळा फेक –**

उमेदवारास ४ किलो वजनाचा गोळा फेकावा लागेल. गोळाफेकीसाठी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील :-

| गोळाफेकीचे अंतर (मीटरमध्ये) | द्यावयाचे गुण |
|---|---|
| ६.०० मीटर किंवा त्यापेक्षा जास्त | ३० |
| ५.५० मीटर किंवा जास्त परंतू ६.०० मीटरपेक्षा कमी | २४ |
| ५.०० मीटर किंवा जास्त परंतू ५.५० मीटरपेक्षा कमी | २० |
| ४.५० मीटर किंवा जास्त परंतू ५.०० मीटरपेक्षा कमी | १० |
| ४.०० मीटर किंवा जास्त परंतू ४.५० मीटरपेक्षा कमी | ०६ |
| ७.०० मीटर पेक्षा कमी | ०० |

गोळा फेकताना उमेदवाराच्या पायाचा स्पर्श सुरवातीच्या सीमारेषेला झाल्यास ती संधी बाद ठरवली जाईल व एक जादा संधी देण्यात येईल. गोळा फेकताना एक चूक क्षम्य असुन त्यासाठी गुण कमी करण्यात येणार नाहीत.

गोळाफेकीत फेकलेला गोळा जर सीमांकन रेषेच्या मध्यावर पडता तर उमेदवारास नजीकच्या वरच्या श्रेणीतील गुण दिले जातील.

**५. सुरक्षा रक्षकांच्या नोंदणी प्रक्रीयेत खालील विशेष अर्हताप्राप्त उमदेवारांना द्यावयाचे अधिकचे गुण :-**

| | |
|---|---|
| १) एम.एस.सी.आय.टी. (MS-CIT) | - ४ गुण |
| २) एन.सी.सी. (N.C.C.) 'अ' प्रमाणपत्र | - २ गुण |
| 'ब' प्रमाणपत्र | - ४ गुण |
| 'क' प्रमाणपत्र | - ६ गुण |

टिप :- अधिकचे गुण हे जास्तीत जास्त १० गुण या मर्यादेपर्यंतच ग्राहय धरण्यात येतील.

**६. अंतिम गुणवत्तायादी प्रसिध्द करावयाची कार्यपध्दती:-**

१. अंतिम गुणवत्ता यादी ही मैदानी चाचणीतील प्राप्त गुण व अधिकचे गुण मिळून निश्चित करण्यात येईल.
२. मैदानी परीक्षेचा निकाल अंतिम झाल्यानंतर संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने (जिल्हा पोलीस प्रशासन) सदर निकाल संबंधित सुरक्षा रक्षक मंडळाच्या अध्यक्षाकडे बंद लिफाफ्यात पाठवावा.
३. संबंधित मंडळाच्या अध्यक्षाने सदर निकाल अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे पाठवावा. शासनाकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतरच मंडळाने सदर निकाल प्रसिध्द करावा.

. वैद्यकीय तपासणी व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र :-

१. अंतिम गुणवत्ता यादीनुसार नोंदणीस पात्र झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी शासकीय रुग्णालयातून करुन सक्षम असल्याचे प्रमाणपत्र मंडळास सादर करावे. रातांधळेपणा, रंगआंधळेपणा (NIGHT BLINDNESS, COLOUR BLINDNESS) असणारा उमेदवार नोंदणीस पात्र ठरणार नाही. कोणतेही शारीरिक व्यंग असल्यास उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

२. तसेच अर्जदाराने मंडळास चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र (Police Verification Report) सादर करणे बंधनकारक राहील. याकरिता संबंधित सुरक्षा रक्षक मंडळ संबंधित शासकीय रुग्णालयास व पोलिस आयुक्तालयास पत्र देईल, त्यानुसार पात्र उमेदवाराने वैद्यकीय सक्षमतेचे व चारित्र्य पडताळणीचे प्रमाणपत्र ४५ दिवसांमध्ये सादर करणे आवश्यक राहील.

**८. नोंदणीसाठी पात्र उमेदवारांची यादी :-**

१. वैद्यकीय तपासणीमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवडसूची तयार करण्यात येईल.

२. अंतिम निवडसुची मधील उमेदवारांना संबंधित सुरक्षा रक्षक मंडळाच्या प्रतिक्षायादी मध्ये घेण्यात येईल.

३. सदर प्रतिक्षायादी ही निकाल प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून २ वर्षापर्यंत अथवा पुढील सुरक्षा रक्षक नोंदणी प्रक्रीयेमधील अंतिम गुणवत्ता यादी जाहिर होईपर्यंत, यापैकी जे आधी असेल तेवढया कालावधीसाठी अस्तित्वात राहील.

**९. सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत कार्यरत सुरक्षा रक्षकांच्या जागी अनुकंपा तत्वावर त्यांच्या वारसाची नोंदणी करण्याबाबतचे निकष :-**

१. सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक मृत पावल्यास त्याच्या जागी प्रथम मृत सुरक्षा रक्षकाचे पती/पत्नीस ते शारीरिक व शैक्षणिक पात्रतेचे निकष पुर्ण करत असल्यास नोंदणी करण्यात येईल.

२. मृत सुरक्षा रक्षकाच्या जागी त्याच्या पत्नीची अनुकंपातत्वावर सुरक्षा रक्षक मंडळामध्ये नोंदणी करतेवेळी कमाल वयाची अट शिथिल करण्यात येत असून, अशा व्यक्तीस कमाल वयाची अट ही ४० वर्ष असेल.

३. मृत सुरक्षा रक्षकाची पती/पत्नी इच्छूक किंवा पात्र नसल्यास त्याचे पाल्य (मुलगा किंवा मुलगी) शारीरिक व शैक्षणिक पात्रतेचे निकष पूर्ण करत असल्यास मंडळात नोंदणी करण्यांत येईल.

४. मृत सुरक्षा रक्षकाच्या दोन पत्नी असल्यास व दोन पत्नींचा वाद उद्भवल्यास अर्जदारास वारसाहक्क प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. त्यातील नमूद वारसास शारीरिक व शैक्षणिक पात्रतेच्या निकषांवर नोंदणीस पात्र ठरल्यास नोंदीत केले जाईल.

५. मृत सुरक्षा रक्षकाच्या वर नमूद केल्याप्रमाणे कोणत्याही एकाच वारसास मंडळ नोंदणी प्रक्रियेत संधी देण्यात येईल.

६. अनुंकपा तत्वावर मृत सुरक्षा रक्षकांच्या वारसास थेट नोंदणी न देता, उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे मंडळामध्ये सुरक्षा रक्षकांची नोंदणी प्रक्रिया करतेवेळी सलग दोन प्रक्रियेत संधी देण्यात येईल व सदर प्रक्रियेत त्यास अतिरिक्त ५ गुण प्रदान करण्यात येतील.

७. सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या जागी अनुकंपा तत्त्वावर त्यांच्या वारसाची नियुक्ती करण्याबाबतचे प्रस्ताव संबंधित सुरक्षा रक्षक मंडळाच्या स्तरावरच अंतिम करण्यात यावेत.

८. उपरोक्त सुरक्षा रक्षकांना वयाची अट वगळता उपरोक्त वरीलप्रमाणे नमूद मैदानी, शारीरिक व शैक्षणिक पात्रतेचे निकष पुर्ण करणे बंधनकारक असेल. त्यानुसार पात्र उमेदवाराने वैद्यकीय सक्षमतेचे व चारित्र्य पडताळणीचे प्रमाणपत्र ४५ दिवसांमध्ये सादर करणे आवश्यक असेल.

९. उमेदवाराने वेळोवेळी विहित केलेले शुल्क अर्जासोबत भरणे आवश्यक राहील.

**१०. मुख्य मालकाच्या शिफारशीनुसार नोंदणी (Recommended by Principle Employer): -**

१. एखादा प्रमुख नियोक्ता आणि त्याच्याकडील खाजगी ठेकेदारामार्फत कार्यरत सुरक्षा रक्षकांनी स्वेच्छापूर्वक स्वत:हून मंडळाकडे येऊन मंडळात नोंदणी करण्याबाबत मागणी केल्यास सदर प्रमुख नियोक्त्यास मंडळात नोंदीत करुन घ्यावे. तसेच त्यांच्याकडील सुरक्षा रक्षकांनाही शारीरिक व शैक्षणिक निकषाच्या अधिन राहून मंडळात नोंदीत करुन सदर सुरक्षा रक्षकांना त्याच प्रमुख नियोक्त्यास वितरीत करण्यात यावे.

२. शिफारस केलेल्या सुरक्षा रक्षकांनी शारीरिक व शैक्षणिक पात्रतेचे या शासन निर्णयात नमुद केलेले निकष पुर्ण करणे बंधनकारक आहे.

३. त्यानंतर सदर आस्थापनेने त्यांच्याकडे कमीत कमी १८० दिवस काम करत असल्याचे हजेरीपत्रक/वेतनपत्रक प्रमाणित करुन मंडळास सादर करणे आवश्यक राहील.

४. तसेच इतर सर्व बाबींची पुर्तता व पडताळणी झाल्यानंतर सुरक्षा रक्षकांस नोंदीत करण्यापुर्वी अर्ज केल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत त्याचेकरीता संबंधित मंडळाने मैदानी परीक्षा आयोजित करणे बंधनकारक असेल.

५. सदर मैदानी परीक्षा ही जिल्हा पोलीस प्रशासन यांच्यामार्फत व जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या सहकार्याने घेतली जाईल.

६. तसेच संबंधित सुरक्षा रक्षकास मैदानी परिक्षेत किमान ५० टक्के गुण प्राप्त करणे बंधनकारक असेल. ५० टक्के पेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यास संबंधित सुरक्षा रक्षक मंडळाच्या स्तरावर सुरक्षा रक्षकाची नोंदणी तात्काळ रद्द करण्यात यावी.

७. मुख्य मालक तसेच खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सी यांनी संबंधित सुरक्षा रक्षक यांचे सेवाकालावधीतील संपुर्ण कायदेशीर देणी अदा केल्याची प्रमाणित प्रत मंडळास सादर

करावी. सदर अभिलेखाची मंडळ स्तरावर खातरजमा केल्यानंतरच सदर सुरक्षा रक्षकांची मंडळात नोंदणी करावी व त्यांना सदर आस्थापनेमध्ये तात्काळ वितरीत करण्यात यावे.

८. नोंदीत आस्थापनेने मंडळाद्वारे निर्धारीत दरानुसार सुरक्षा रक्षकांच्या एक महिन्याच्या आगाऊ वेतनाचा भरणा मंडळात प्रथम करावा.

९. उपरोक्त प्रक्रीयेनुसार पात्र झालेल्या व नोंदीत झालेल्या आस्थापनेकडे वितरीत केलेल्या सुरक्षा रक्षकांना किमान १ वर्ष कामावर ठेवणे सदर नोंदीत आस्थापनेस बंधनकारक असेल.

१०. उपरोक्त ८ व ९ बाबतीत नोंदीत मुख्य मालकाचे हमीपत्र घेण्यात यावे.

११. उपरोक्त सुरक्षा रक्षकांना कमाल वयोमर्यादा ही ४५ वर्षे अशी असेल.

१२. पात्र उमेदवाराने वैद्यकीय सक्षमतेचे व चारित्र्य पडताळणीचे प्रमाणपत्र ४५ दिवसांमध्ये सादर करणे आवश्यक असेल. (उमेदवाराने वेळोवेळी विहित केलेले शुल्क अर्जासोबत भरणे आवश्यक राहील.)

१३. मुख्य मालकाच्या शिफारशीनूसार मंडळात नोंदणी करतेवेळी सुरक्षा रक्षकांना मैदानी चाचणीतून सुट देण्याचा अधिकार कोणासही असणार नाही.

**११. परिणामीत (Affected) सुरक्षा रक्षकांची मंडळात नोंदणी करण्याबाबतचे निकष :-**

१. सुरक्षा रक्षक मंडळात मुख्य मालक म्हणून नोंदीत झाल्यानंतर सदर आस्थापनेस त्यांच्या मागणीनुसार मंडळाच्या प्रतिक्षा यादीवरील सुरक्षा रक्षक वितरीत करण्यात येतात. मंडळाचे नोंदीत सुरक्षा रक्षक त्याठिकाणी वितरीत केल्यानंतर, पूर्वी मुख्य मालकाकडे कार्यरत असलेले तसेच खाजगी एजन्सीमार्फत कार्यरत असलेल्या खाजगी सुरक्षा रक्षकांच्या नोकरीवर गदा येते. अशा सुरक्षा रक्षकांना परिणामीत (Affected) सुरक्षा रक्षक म्हणून संबोधण्यात यावे.

२. मंडळाच्या कार्यक्षेत्रातील अनोंदीत आस्थापना किंवा कंपनीस निरीक्षकांनी भेट देऊन केलेल्या कार्यवाहीचा परिणाम म्हणून जर प्रमुख नियोक्ता मंडळाकडे नोंदीत होऊन, त्यांनी त्यांचेकडील कार्यरत खाजगी सुरक्षा रक्षकांऐवजी मंडळाच्या प्रतिक्षा यादीवरील सुरक्षा रक्षकांची मागणी केल्यास सदर प्रमुख नियोक्त्यास नोंदीत करुन घेऊन त्यांना मंडळाचे प्रतिक्षा यादीवरील सुरक्षा रक्षक वितरीत करावेत.

३. तसेच अशा आस्थापनेकडे कार्यरत असलेल्या खाजगी सुरक्षा रक्षकांना परिणामीत समजून शारीरिक व शैक्षणिक पात्रतेचे निकष पुर्ण करणे बंधनकारक राहील. तसेच संबंधित सुरक्षा रक्षकांनी /आस्थापनेने/ एजन्सीने अर्जदार सुरक्षा रक्षकांचे हजेरीपत्रक/वेतनपत्रक, प्रमुख नियोक्त्याकडे केव्हापासून कार्यरत आहे, याबाबतचा तपशिल इत्यादी प्रमाणित अभिलेख मंडळास सादर करणे आवश्यक राहील.

४. अशा अभिलेखाची मंडळ स्तरावर खातरजमा केल्यानंतरच सदर परिणामीत सुरक्षा रक्षकांची मंडळात नोंदणी करावी व त्यांना मंडळाच्या प्रतिक्षा यादीवर घ्यावे. सदर अर्जदाराने आस्थापनेमध्ये खाजगी एजन्सीमार्फत कमीत कमी १८० दिवस काम करणे आवश्यक राहिल.

५. उपरोक्त सुरक्षा रक्षकांना कमाल वयोमर्यादा ही ४५ वर्षे अशी असेल.

६. अशा उमेदवाराने या शासन निर्णयातील शैक्षणिक, शारीरिक पात्रतेचे निकष पूर्ण करणे, त्यानुसार पात्र उमेदवाराने वैद्यकीय सक्षमतेचे व चारित्र्य पडताळणीचे प्रमाणपत्र ४५ दिवसांमध्ये सादर करणे आवश्यक असेल. (सुरक्षा रक्षक मंडळाने वेळोवेळी विहित केलेले शुल्क उमेदवाराने अर्जासोबत भरणे आवश्यक राहील)

७. उपरोक्त प्रकारे इतर सर्व बाबींची पुर्तता व पडताळणी झाल्यानंतर सुरक्षा रक्षकांस नोंदीत करण्यापुर्वी नोंदणी (registration) दिनांकापासून ९० दिवसांच्या आत त्याचेकरीता संबंधित मंडळाने मैदानी परीक्षा आयोजित करणे बंधनकारक असेल.

८. संबंधित सुरक्षा रक्षकास मैदानी परीक्षेत किमान ५० टक्के गुण प्राप्त करणे बंधनकारक असेल. ५० टक्के पेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यास मंडळ स्तरावर सुरक्षा रक्षकाची नोंदणी तात्काळ रद्द करण्यात यावी.

९. अशा उमेदवाराची नोंदणी करतेवेळी मैदानी चाचणीतून सुट देण्याचा अधिकार कोणासही असणार नाही.

**१२. सुरक्षा रक्षक नोंदणी प्रक्रीयेत माजी सैनिकांची व अग्निवीरांची नोंदणी करताना अनुसरावयाची कार्यपध्दती :-**

१. अर्जदार लष्करी (भूदल, नौदल, वायूदल) व निमलष्करी (ITBP-भारत-तिबेट सीमा पोलीस, BSF-सीमा सुरक्षा दल, CISF-केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, CRPF-केंद्रीय राखीव पोलीस दल व SSB-सशस्त्र सीमा दल) दलामधील निवृत्त-माजी सैनिक व अग्निवीर असतील, तर त्यांना संबंधित मंडळामध्ये सुरक्षा रक्षक या पदावर थेट नोंदीत करण्यात येईल.

२. माजी सैनिकांना व अग्निवीरांना शारीरिक व शैक्षणिक पात्रतेची तसेच वयाची अट लागू असणार नाही, परंतु त्यांनी खालील कागदपत्रांची पुर्तता करणे बधंनकारक असेल:-

    १. शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय सक्षमतेचे प्रमाणपत्र :-
    वैद्यकीय तपासणी शासकीय रुग्णालयातून करुन सक्षम असल्याचे प्रमाणपत्र मंडळास सादर करावे. रातांधळेपणा, रंगआंधळेपणा (NIGHT BLINDNESS, COLOUR BLINDNESS) असणारा उमेदवार नोंदणीस पात्र ठरणार नाही. कोणतेही शारिरीक व्यंग असल्यास उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

    २. चारित्र्य पडताळणीचे प्रमाणपत्र

    ३. सैनिकी सेवेतुन निवृत्त माजी सैनिकांच्या बाबतीत निवृत्ती पुस्तकाची छायांकित प्रत.

    ४. वैद्यकीय सक्षमतेचे व चारित्र्य पडताळणीचे प्रमाणपत्र ४५ दिवसांमध्ये सादर करणे आवश्यक राहील.

१३. सुरक्षा रक्षकांच्या नोंदणी प्रक्रीयेवेळी शारीरिक चाचणी व मैदानी परीक्षेकरिता उपरोक्त नमूद सर्व निकषांमध्ये सदर उमेदवाराने पात्र असणे आवश्यक असून यामध्ये कोणत्याही प्रकारची सूट देण्याचा अधिकार कोणालाही नसेल.

१४. उपरोक्त नमूद सर्व सुरक्षा रक्षकांची मंडळात नोंदणी करुन आस्थापनेस वितरीत केल्यानंतर सदर सुरक्षा रक्षक वयाची ५८ वर्ष पूर्ण होईपर्यंत सुरक्षा रक्षक म्हणून मंडळामध्ये कार्यरत राहील. त्यापुढे कोणत्याही परिस्थितीत अशा सुरक्षा रक्षकास काम करता येणार नाही.

१५. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण ) अधिनियम १९८१ च्या कलम ८(४) मधील तरतूदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संकेताक २०२५०३२७१८०७५११७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DILIP APPASAHEB VANIRE

Digitally signed by DILIP APPASAHEB VANIRE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=6528375b6f910d9002decde58c70eb2e2ccb5cc8ae73ab bb268fad63bcf02405ca, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBFC9AC7B1D0E1461368FAA77C084A32DF13 3A6A0033F9933F909F3220091227, cn=DILIP APPASAHEB VANIRE
Date: 2025.03.27 18:10:09 +05'30'

**( दिलीप वणिरे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा. मंत्री (कामगार) याचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (कामगार) याचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
५. कामगार आयुक्त, कामगार भवन, मुंबई.
६. सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक, महाराष्ट्र राज्य.
७. संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे
८. सह आयुक्त,कामगार मुंबई.
९. अध्यक्ष, सर्व जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळे.
१०. निवड नस्ती (कामगार-५).